१४१८

# भावनांना

देगा देगा देवा,
दृष्टीचेच ओठ
प्रकृतीचा कांठ भावनांना।

तसा बैठकीला
धर्माचाच पाट
सौजन्याचे ताट भावनांना।

करावया पार
कर्तव्याचा घाट
सद्बुध्दीची लाट भावनांना।

तोलायची पुढे
संयमाची वाट
ब्रह्मानंदी गांठ भावनांना।

३/११/८२

सहदेव मस्वाले